# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : diplomadesk10dte@gmail.com website: www.dte.org.in


कालमर्यादित
दि. २७.७.२०१६

जा.क्र : १०/एनजीपी/एनबीए मुल्यांकन/२०१६/५३८
दिनांक : 21 JUL 2016

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे.

विषय:- सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांचे एनबीए (NBA) कडून मूल्यांकन करुन घेण्याबाबत...

संदर्भ-१) या संचालनालयाचे परिपत्रक क्र. १०/एनजीपी/एनबीए/२०१५/१११९, दि.१६.९.२०१५
२) या संचालनालयाचे पत्र क्र. १०/एनजीपी/एनबीए/२०१५/१२४४, दि. ७.११.२०१५
३) या संचालनालयाचे परिपत्रक क्र. १०/एनजीपी/एनबीए/२०१५/१३००, दि.९.१२.२०१५
४) या संचालनालयाचे पत्र क्र. १०/एनजीपी/एनबीए/शातंनि/२०१६/३४१, दि.२.४.२०१६ व दि. १३.७.२०१६

उपरोक्त संदर्भिय क्र. १ च्या परिपत्रकान्वये तंत्रशिक्षण विभागाचे विभागीय कार्यालयातंर्गत येणा-या शासकीय /शासन अनुदानित तंत्रनिकेतने/ औषधनिर्माणशास्त्र संस्था मधील अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अख्यत्यारीतील सुरु असलेल्या पदविका अभ्यासक्रमाचे National Board of Accreditation, New Delhi यांचे कडून Accreditation प्राप्त करुन घेण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच Accreditation बाबतच्या मानांकनाचे प्रस्तावासंबधी/प्रत्यक्ष मिळालेले मानांकन या बाबत संस्थानिहाय सद्यस्थितीचा अहवाल सहसंचालक, विभागीय कार्यालयांनी एकत्रित संकलित करुन देण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच NBA मानांकनासाठीचे प्रक्रीया शुल्क संस्थेचे विकास निधीमधुन खर्च करण्यास परवनागी देण्यात आलेली होती.

सदरहु परिपत्रकानुसार प्राप्त आलेल्या अहवालामध्ये NBA मुल्यांकनाबाबतच्या महत्वाचे काही मुद्याबाबतची माहिती नमुद नसल्यामुळे या संचालनालयाचे उपरोक्त संदर्भिय क्र. २ च्या पत्रान्वये पत्रातील नमुद १ ते ४ मुद्याबाबतच्या माहितीसह एकत्रित माहीती विभागीय कार्यालयाचे स्तरावर संकलित करुन पाठविण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच सर्व शासकीय व शासन अनुदानित संसथानी त्यांचे संस्थेतील पात्र अभ्यासक्रमाचे NBA मुल्याकनांचे कार्यवाहीकरीता अंतर्गत Self Assessment करुन त्यानुसार कार्यवाही करण्याबाबत सदर पत्रात नमुद करण्यात आले होते.

तसेच National Board of Accreditation, New Delhi यांचे दि. २४.११.२०१५ चे पत्रान्वये पदविका अभ्यासक्रमासाठी Accreditation ची सुधारीत फी बाबतची माहिती या संचालनालयाचे दि. ९.१२.२०१५ च्या परिपत्रकान्वये पदविका अभ्यासक्रमांच्या सर्व संस्थाना कळविण्यात आलेली होती. तसेच शासकीय तंत्रनिकेतना

मधील अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद मान्यता प्राप्त पुर्णवेळ अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाचे एन बी ए ॲक्रीडिटेशन सप्टेंबर २०१६ अखेर पर्यंत पूर्ण करण्याबाबत शासकीय तंत्रनिकेतनांच्या सर्व प्राचार्यांना संचालनालयाचे दि. २.४.२०१६ चे पत्रान्वये कळविण्यात आले होते. तसेच ज्या संस्थांमधील अभ्यासक्रमांचे N B A ॲक्रीडीटेशनचा वैधता कालावधी पूर्ण झालेला आहे, अशा संस्थांनी सुध्दा त्यांचे सदरहु अभ्यासक्रमाचे N B A ॲक्रीडीटेशनचे नुतनीकरणाची प्रक्रीया पुर्ण करण्याबाबतही कळविण्यात आले होते.

तथापी या संचालनालयाच्या दि. १३.७.२०१६ चे पत्रान्वये N B A मानांकनाबाबतच्या सद्यस्थिती बाबत मागविण्यात आलेल्या प्राप्त माहिती नुसार NBA मानांकनासाठी काही संस्थांनी अद्याप अर्ज केलेला नाही, तयारी सुरु आहे असे कळविण्यात आलेले आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारीतील व संचालनालयाचे अंतर्गत असलेल्या सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी व पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांचे NBA मुल्यांकनाबाबत आढावा घेण्यासाठी मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे दालनात दि. १४.७.२०१६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरहु बैठकीत मा. प्रधान सचिव यांनी खालील नमुद मुद्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश या संचालनालयास दिलेले आहेत.

१. तंत्रशिक्षण संचालनालयातंर्गत असलेल्या सर्व शासकीय व अशासकीय अनुदानीत पदवी व पदविका संस्थांचे NBA व्दारे मूल्यांकन करुन घेण्यासाठी प्रयत्न करावेत.
२. ज्या संस्थांचे NBA व्दारे मुल्यांकन झालेले नाही त्या संस्थांना NBA चे मानकानुसार Self Assesment करुन घेण्यासाठी कळविण्यात यावे.
३. Self Assesment नंतर शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी व पदविका अभ्यासक्रमांच्या किती संस्था NBA मुल्यांकनासाठी अर्ज करु शकतात याबाबतची माहिती घेण्यात यावी.

तरी आपले विभागांगर्तत असलेल्या सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांकडून वर नमुद मुद्यांच्या अनुषंगाने तात्काळ आढावा घेण्यात यावा व संबधित संस्थांना National Board of Accreditation, New Delhi यांचे व्दारे मुल्यांकन करुन घेण्याबाबतची कार्यवाही तात्काळ सुरु करण्याबाबत आपले स्तरावरुन कळविण्यात यावे.

तसेच आपले विभागांतर्गत असलेल्या सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांची वर नमुद मुद्यांच्या अनुषंगाने NBA मूल्यांकना संदर्भातील माहीती diplomadesk10dte@gmail.com या ईमेलवर दि. २७.०७.२०१६ पर्यत तात्काळ सादर करावी. सदरहु माहीती शासनास सादर करावयाची असल्याने त्यास प्रथम प्राधान्य देण्यात यावे.

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा, मुंबई

---

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/NBA/२०१६/2553
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 26 JUL 2016

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

**प्रत :-**

१) प्राचार्य, सर्व शासकीय/अनुदानित पदविका संस्था यांना कळविण्यात येते की, वरील पत्रात नमुद मुद्याच्या अनुषंगाने माहिती त्या पत्रात दिलेल्या ई-मेलवर संचालनालयास सादर करावी व त्याची एक प्रत दिनांक २८/७/२०१६ पर्यंत या कार्यालयास सादर करावी.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.